नियमीत दिवाणी दावा क्रमांक २७३/२०१२

CNR No. -MHKO07000730-2012

निशाणी ५ वरील आदेश

सविता आण्णासो पाटील – वादी

वि.

वैशाली विश्राम कांबळे (जाधव), व. – प्रतिवादी

१. प्रस्तुतचा दावा खरेदीपत्र पुर्ण होवून मिळणेसाठीचा आहे. प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादीं विरुध्द तुर्तातुर्त मनाई मिळणेसाठी साठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथन असे आहे की, जिल्हा कोल्हापूर, ता. शिरोळ पैकी मौजे यड्राव येथील गट नं. २, हिस्सा क्रं. १ क्षेत्र हे. ०६.६९ आर., पो. ख. ०.३० आर, यापैकी ०.६५ आर क्षेत्र, यास चतुःसिमा पूर्वेस – रस्ता, पश्चिमेस व दक्षिणेस – वादीच्याच मालकीची मिळकत, उत्तरेस – रामू धोंडी कातरुट यांनी अभिषेक पाटील यांना साठेखताने दिलेली मिळकत, याबाबत वाद आहे. (त्यास येथून पुढे दावा मिळकत असे संबोधले आहे.)

३. वादीचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकत महादेव भिकू कांबळे यांचे वारस म्हणून विश्राम कांबळे यांच्या मालकी वहीवाटीची असून त्यांनी ती वादीस खरेदी देण्याचे ठरवून दिनांक १६/०९/२००६ रोजी साक्षीदारांसमक्ष रजि. करारपत्र नं. ५८४५ ने करुन दिले आहे. दावा मिळकत प्रतिवादीस प्रकल्प पुनर्वसनग्रस्त म्हणून मिळाली असून मयत विश्राम यांनी खरेदीसाठी लागणार खर्च करुन, शासनाची परवानगी घेवून वादीस लेखी कळविण्याचे व कळविल्यापासून सहा महीन्याच्यात खरेदीपत्र पुर्ण करण्याचे ठरले. करारपत्राने दावा मिळकतीचा कब्जा त्यास मिळाला आहे.

४. वादीचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकतीस आता आता मोठी किंमत येऊ लागल्याने प्रतिवादींनी मिळकत तबदील करण्याचा प्रयत्न चालु केला. म्हणून तीने दैनिक महासत्तामध्ये जाहीर नोटीस दिली. त्यास प्रतिवादींनी जाहीर नोटीस खुलासा देवून दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी नं. ४ व ५ यांचा हक्क व हिस्सा आहे. प्रतिवादीं करार नाकारुन दावा मिळकत अन्य इसमास तबदील करण्याचा प्रयत्नात असून तीचे कब्जेवहीवाटीस हरकत व अडथळा करत आहेत. सबब प्रतिवादींनी दावा मिळकती तबदील करु नये तसेच दावा मिळकतीतील तिचे कब्जेवहीवाटीस हरकत व अडथळा करु नये म्हणून तुर्तातुर्त मनाई आदेश होणे विषयी तिने विनंती केली आहे.

५. प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी निशाणी ४४ कडे म्हणणे देवून प्रस्तुत अर्जास विरोध केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, त्यांचे आजोबा व प्रतिवादी नं. ४ व ५ यांचे वडील महादेव भिकू कांबळे यांना शासनाकडून यड्राव येथील गट नं. २ हिस्सा क्रं. १ मधील ०.६५ आर जमीन वाटप करण्यात आली. वाटप होताना भिकू मयत असल्याने वारस म्हणून विश्राम कांबळे यांच्या नांवे वाटप करण्याबाबत आदेश झाला आहे. त्याप्रमाणे तलाठी यड्राव यांचे व पंचाचे समक्ष कब्जेपट्टी पंचनामा करुन दावा मिळकत प्रतिवादींना दिलेली आहे. तेंव्हापासून दावा मिळकतीमध्ये त्यांची कब्जेवहीवाट आहे. दावा मिळकतीचे सातबारापत्रकी मालकी सदरी त्यांच्या नावांची नोंद आहे. त्यास वादीने हरकत घेतलेली नाही.

६. त्यांचे पुढे असे कथन आहे की, वादीने नोटीस प्रसिध्द केल्यानंतर त्यांनी वकीला मार्फत जाहीर खुलासा दिला आहे. त्यास वादीने उत्तर दिलेले नाही. प्रतिवादी नं. ४ व ५ या महादेवू भिकू कांबळे याच्या मुली आहेत. त्यांचा दावा मिळकतीत हिस्सा आहे. विश्राम

कांबळे यांनी वादीला कोणतेही साठेखत करुन दिलेले नाही. साठेखतावर विश्राम कांबळे यांची सही नाही. ते बोगस व बनावट आहे. सबब त्यानी अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

७. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

८. अर्ज, त्यावरील म्हणणे, युक्तीवाद व अभिलेखाचे अवलोकन केले असता अर्जाच्या निर्णयाच्या दृष्टीने पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष पुढील नमुद कारणांकरीता नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रथमदर्शी केस वादींच्या पक्षात आहे काय ? | ....होय. |
| २ | सोईचा समतोल वादींच्या पक्षात आहे काय ? | .... होय. |
| ३ | तुर्तातुर्त मनाई आदेश पारित न केल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होणार आहे असे वादी सिध्द् करतात काय? | .... होय. |
| ४ | आदेश काय ? | ... अर्ज खर्चासह मंजूर करणेत येतो. |

## का र ण मि मां सा

### वादप्रश्न क्रमांक १ ते ३ बाबत –

९. वादीच्या कथनानुसार दावा मिळकत प्रतिवादींनी तिला खरेदी देण्याचे ठरवून दिनांक १६/०९/२००६ रोजी साक्षीदारांसमक्ष रजिस्टर्ड खरेदीपत्र करुन दिले आहे व त्याच दिवशी दावा मिळकतीचा कब्जा दिलेला आहे. तेंव्हापूसन तिची दावा मिळकतीवर कब्जे वहीवाट आहे. परंतु दावा मिळकतीची किंमत आता वाढल्यामुळे प्रतिवादी त्रयस्त इसमास विकण्याचा प्रयत्न करीत आहे. ते सिध्द करण्यासाठी वादीने निशाणी ३/२ कडे रजिस्टर्ड

करारपत्र नं. ५८४५/२००६ चा हजर केला आहे. त्याचे अवलोकनावरुन असे दिसून येते की, दावा मिळकती प्रतिवादीचे पूर्वहक्कदारानी वादीस खरेदी देण्याचे ठरवून त्याचा कब्जा त्याच दिवशी वादीला दिला आहे. तसेच नि. ५६ कडे वादीने हजर केलेल्या ऊसनोंद अर्ज व ऊसनोंद दाखल्यावरुन दावा मिळकतीत वादी पिक करत असल्याचे प्रथमदर्शी दिसून येते.

१०. वादीने निशाणी ४८ कडे आप्पासो सातगोंडा पाटील, निशाणी ४९ कडे तात्यासो आण्णासो दानोळे व निशाणी ५० कडे प्रदिप भाऊसो कोळी या साक्षीदारांचे ॲफेडेव्हीट घातले असून यासर्व साक्षीदारांनी दावा मिळकती शेजारी त्यांची मिळकत असून दावा मिळकत वादीच्या कब्जेत असल्याचे त्यांनी सांगीतले आहे. तसेच निशाणी ५१ कडे संजय मारुती घोरपडे यांचे वादीने ॲफिडेव्हीट घातले आहे. सदर साक्षीदाराने तो बॉण्ड रायटर असून दिनांक १६/०९/२००६ रोजी वादातीत काररपत्र वादी व प्रतिवादींचे पूर्वहक्कदार यांच्या सांगण्यावरुन तयार केला असल्याचे सांगीतले आहे. तसेच रामचंद्र तानाजी पाटील, चंद्रकांत सोमा कांबळे यांच्या समक्ष त्यांनी तो दस्त उभय पक्षकारांना वाचून दाखविला, त्यावर त्यांच्या व साक्षीदारांच्या सहया त्याच्या समक्ष घेतल्याचे सांगीतले आहे.

११. प्रतिवादींनी जरी त्यांचा दावा मिळकतीवर कब्जा असल्याचे म्हटले असले तरी त्याबाबत कोणताही पुरावा हजर केलेला नाही. याउलट वादातीत करारपत्राचे अवलोकनावरुन दावा मिळकतीचा कब्जा पूर्वी वादीकडेच होता आणि तोच करारपत्राने कायम केलेला आहे, असे त्यामध्ये नमूद केले असल्याचे दिसून येते. त्यामुळे जरी प्रतिवादींनी तशी कब्जेपट्टी झाली असल्याचे सांगीतले असले तरी प्रत्यक्ष कब्जा त्यांच्याकडे नसल्याचे स्पष्ट होते. यासर्व वादीतर्फे हजर केलेल्या प्रथमदर्शी पुराव्यावरुन दावा मिळकत वादीच्या कब्जेत असल्याचे सिध्द होते.

निशाणी ३/३ व ४ कडील वादीने दिलेल्या जाहीर नोटीस आणि त्यास प्रतिवादीतर्फे दिलेला खुलासा याचे अवलोकन केले असता प्रतिवादीने दावा मिळकती बाबतचा करार नाकारलेला असून त्याचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नसल्याचे प्रतिवादीचे म्हणणे असल्याचे दिसून येते. दावा करारपत्र पुर्ण होवून मिळण्यासाठी आहे त्यामुळे दावा मिळकत तबदील झाल्यास वादीचेन भरुन येणारे नुकसान होणार आहे. तसेच दावा मिळकत वादीच्या कब्जात असल्याचे प्रथमदर्शी सिध्द झाले असल्यामुळे त्यास प्रतिवादी हरकत व अडथळा करण्याची शक्यता असल्यामुळे सोयीचा समतोल वादीच्या वतीने दिसून येतो. तसेच तशी हरकत केल्यामुळे वादीचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे असे दिसून येते. यासर्व बाबींचा विचार करता वादप्रश्न क्रमांक १ ते ३ चे उत्तर ' होय ' असे दिले आहे.

**<u>वादप्रश्न क्रमांक ४ बाबत–</u>**

१२. वर नमूद केल्याप्रमाणे प्रथमदर्शी केस व सोयीचा समतोल वादीच्यावतीने असून वादीचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे असे दिसून येत असल्यामुळे प्रार्थील्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई मिळण्यासाठी वादी पात्र आहे. म्हणून वादप्रश्न क्रमांक ४ चे अनुषंगे खालीलप्रमाणे आदेश करणेत येतो.

**<u>आदेश</u>**

अ. अर्ज खर्चासह मंजूर करणेत येतो.

ब. प्रतिवादींनी प्रस्तुत दाव्याच्या अंतिम निकाला पर्यंत दावा मिळकत कोणत्याही प्रकारे तबदील करण्याची नाही व दावा मिळकतीतील वादीचे कब्जेवहीवाटीस हरकत व अडथळा करणेचा नाही.

सही/–

दिनांकः ०३/१२/२०१८ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, जयसिंगपूर

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. S.S. Mandarekar, stenographer (L.G.) |
| Name of Court | Jt. Civil Court, J.D.,& J.M.F.C., Jaysingpur, Tal. Shirol, Dist. Kolhapur. |
| Date of Dictation | 03/12/2018 |
| Judgment/order signed by the P.O. on | 03/12/2018 |
| Judgment/Order uploaded on | 07/12/2018 |